"श्री. तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सव 2026 जाहिरनामा."

ज्याअर्थी उप विभागीय पोलीस अधिकारी, उप विभाग तुळजापूर यांनी त्यांचे कडील पत्र वाहतुक मार्ग बदल/4846/2026 दिनांक 01/10/2026 अन्वये सादर केलेल्या अहवालात नमुद केले आहे की, श्री. तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सव दिनांक 11/10/2026 ते दिनांक 27/10/2026 पावेतो साजरा होत आहे. सदर कालावधी मध्ये तुळजापुर शहरात संपुर्ण महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा इत्यादी राज्यातून भाविक मोठया प्रमाणात पायी चालत येत असतात त्यामुळे भावीकांची मोठया प्रमाणात रस्त्यावर तसेच तुळजापुर शहरात व परिसरात गर्दी होते.

कोजागिरी पोर्णीमेच्या अगोदरचा एक दिवस (दिनांक 24/10/2026) तसेच कोजागिरी पोर्णीमेचा दिवस (दिनांक 25/10 /2026) व नंतरचा एक दिवस (दिनांक 26/10/2026) या दरम्यान सोलापुर रोड, नळदुर्ग रोड, लातुर रोड तसेच धाराशिव रोडने सुमारे सात ते आठ लाख भावीक हे पायी चालत तुळजापुर कडे येतात. तसेच नवरात्र कालावधीत दुर अंतरावरुन भावीक चालत आल्याने थकुन ते रस्त्याचे कडेला विसावा घेतात/ झोपतात.

नवरात्र महोत्सव दरम्यान तुळजापुर शहर व परिसरामध्ये भावीकांची मोठया प्रमाणावर गर्दी होते. सदर कालावधीत धुळे-सोलापुर, तुळजापुर- लातुर, तुळजापुर-नळदुर्ग, या रोडवर मोठया प्रमाणावर जड वाहतुक चालु असते सदरची वाहतुक चालु राहील्यास पायी चालत येणा-या अथवा रस्त्याच्या कडेला थांबलेल्या भाविकासोबत एखादा अनुचीत प्रकार घडण्याची अथवा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी पायी चालत येणा-या भावीकांच्या सुरक्षिततेसाठी तुळजापुर शहराकडे यणारी तसेच तुळजापुर शहरातुन बाहेर जाणारी सर्व प्रकारची वाहतुक / जड वाहतुक (Light Vehicles and Heavy Vehicles) ही दिनांक 23/10/2026 रोजीचे 00:01 ते दिनांक 26/10/2026 रोजीचे 24:00 वा पर्यत खालील प्रमाणे वळविणे बाबत विनंती केली आहे.

दिनांक 25/10/2026 रोजी कोजागीरी पौर्णिमा व दिनांक 26/10/2026 रोजी मंदिर पौर्णिमा निमित्त महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा राज्यातुन लाखोंच्या संख्येने भाविक पायी येत असतात. सदर नवरात्र महोत्सव कालावधीत तुळजापूर शहर व परिसरामध्ये भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होते. अशा वेळी वाहतुकीची कोंडी होवु नये, भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारचा अपघात होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये, याकरीता भाविक पायी चालत येणारे मार्गावरील वाहने अन्य मार्गाने वळविणे आवश्यक असल्याचे आमचे निदर्शनास आणून दिले आहे.

तसेच प्रभारी अधिकारी वाहतुक शाखा धाराशिव यांनी त्यांचे जा.क्रं. 1522/2026 दि 03/10/2026 अन्वये उप विभागीय पोलीस अधिकारी, उप विभाग तुळजापुर यांनी दिले अहवालाप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

त्याअर्थी आम्ही किर्ती किरण पुजार (भा.प्र.से.), जिल्हादंडाधिकारी, धाराशिव व रितु खोखर (भा.पो.से.), पोलीस अधीक्षक, धाराशिव, आम्हास प्राप्त असलेल्या महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 33 (1) (ब) अन्वये, अधिकाराचा वापर करुन भाविकांचे सुरक्षीततेच्या कारणावरुन, खालील प्रमाणे वाहतुक मार्गात बदल करणे बाबत निर्देशित करीत आहोत.

दिनांक 23/10/2026 रोजीचे 00:01 ते दिनांक 26/10/2026 रोजीचे 24:00 वा. दरम्यान खालील मार्गावरुन पथक्रमण करण्यास सर्व प्रकारच्या वाहनास (Light & Heavy Vehicles) मनाई करण्यात येत आहे.

1)धाराशिव ते हैद्राबाद कडे जाणाऱ्या वाहतुकीला धाराशिव पासुन →तुळजापुर →नळदुर्ग →व पुढे उमरगा पर्यत मनाई करण्यात येत आहे.

2)हैद्राबाद ते धाराशिव कडे येणाऱ्या वाहतुकीला उमरगा → नळदुर्ग → तुळजापुर → पुढे धाराशिव पर्यत मनाई करण्यात येत आहे.

3) हैद्राबाद ते छत्रपती संभाजीनगर कडे येणाऱ्या वाहतुकीला उमरगा पासुन →नळदुर्ग→ तुळजापूर→ व पुढे धाराशिव पर्यंत मनाई करण्यात येत आहे.

4) छत्रपती संभाजीनगर ते हैद्राबाद कडे जाणाऱ्या वाहतुकीला धाराशिव पासुन →तुळजापूर→ नळदुर्ग → व पुढे उमरगा पर्यंत मनाई करण्यात येत आहे.

5) धाराशिव ते सोलापुर कडे जाणाऱ्या वाहतुकीला धाराशिव पासुन → तुळजापुर → तामलवाडी→ व पुढे सोलापुर

पर्यत मनाई करण्यात येत आहे.
6) सोलापूर ते धाराशिव कडे येणाऱ्या वाहतुकीला सोलापुर पासुन →तामलवाडी →तुळजापुर→ व पुढे धाराशिव पर्यत मनाई करण्यात येत आहे.
7) लातुर ते सोलापूर कडे जाणाऱ्या वाहतुकीला औसा पासुन→ तुळजापूर → तामलवाडी → व पुढे सोलापूर पर्यंत मनाई करण्यात येत आहे.
8) सोलापूर ते लातुर कडे येणाऱ्या वाहतुकीला सोलापूर पासुन →तामलवाडी →तुळजापूर →व पुढे औसा पर्यंत मनाई करण्यात येत आहे.
9) छत्रपती संभाजीनगर ते सोलापूर कडे जाणाऱ्या वाहतुकीला येरमाळा पासुन→ धाराशिव → तुळजापूर तामलवाडी →व पुढे सोलापूर पर्यंत मनाई करण्यात येत आहे.
10) सोलापूर ते छत्रपती संभाजीनगर कडे येणाऱ्या वाहतुकीला सोलापूर पासुन → तामलवाडी →तुळजापूर → धाराशिव →व पुढे येरमाळा पर्यंत मनाई करण्यात येत आहे.
11) तुळजापुर ते सोलापुर कडे जाणाऱ्या वाहतुकीला तुळजापुर पासुन → तामलवाडी → पुढे पासुन सोलापुर पर्यंत मनाई करण्यात येत आहे.
12) सोलापुर ते तुळजापुर कडे येणाऱ्या वाहतुकीला सोलापुर पासुन→ तामलवाडी → पुढे तुळजापुर पर्यंत मनाई करण्यात येत आहे.
13) तुळजापूर ते बार्शी कडे जाणाऱ्या वाहतुकीला तुळजापूर पासुन → ढेकरी → गौडगाव→ व पुढे बार्शी पर्यंत मनाई करण्यात येत आहे.
14) बार्शी ते तुळजापूर कडे येणाऱ्या वाहतुकीला बार्शी पासुन → गौडगाव → ढेकरी →व पुढे तुळजापूर 'पर्यंत मनाई करण्यात येत आहे.

सदरील मार्गावरील वाहने खालील प्रमाणे मार्गक्रमण करतील.

1) धाराशिव ते हैद्राबाद कडे जाणारी वाहतुक धाराशिव →औसा → उमरगा→ पुढे हैद्राबादकडे पथक्रमण करतील.
2) हैद्राबाद ते धाराशिव कडे येणारी वाहतुक उमरगा →औंसा→ पुढे धाराशिव अशी पथक्रमण करतील.

3)हैद्राबाद ते छत्रपती संभाजीनगर कडे येणारी वाहतुक उमरगा→ औसा→ लातूर → अंबाजोगाई→ मांजरसुंबा →बीड मार्गे पुढे छत्रपती संभाजीनगर कडे पथक्रमण करतील.
* किंवा उमरगा → औसा → लातूर →मुरुड→ ढोकी →येडशी→ बीड मार्गे छत्रपती संभाजीनगर कडे पथक्रमण करतील.
4) छत्रपती संभाजीनगर ते हैद्राबाद कडे जाणारी वाहतुक छत्रपती संभाजीनगर→ बीड→ मांजरसुंबा →अंबाजोगाई→ लातूर → औसा →उमरगा मार्गे पुढे हैद्राबादकडे पथक्रमण करतील.
किंवा छत्रपती संभाजीनगर→बीड → येडशी → ढोकी→ मुरुड→ लातूर →औसा → उमरगा मार्गे पुढे हैद्राबादकडे पथक्रमण करतील.
5) धाराशिव ते सोलापूर कडे जाणारी वाहतुक धाराशिव → वैराग→ पुढे सोलापुरकडे पथक्रमण करतील.
6) सोलापूर ते धाराशिव कडे येणारी वाहतुक सोलापुर→ वैराग→ पुढे धाराशिव कडे पथक्रमण करतील.
7) लातुर ते सोलापूर कडे जाणारी वाहतुक मुरुड पासुन→ ढोकी → येडशी → बार्शी →पुढे सोलापूर मार्गे पथक्रमण करतील.
8) सोलापूर ते लातुर कडे येणारी वाहतुक सोलापूर पासुन →बार्शी → येडशी →> ढोकी →मुरुड→ पुढे लातुर या मार्गे पथक्रमण करतील.
9) छत्रपती संभाजीनगर ते सोलापूर कडे जाणारी वाहतुक येरमाळा पासुन→बार्शी → पुढे सोलापूर या मार्गे पथक्रमण करतील.
10) सोलापूर ते छत्रपती संभाजीनगर कडे येणारी वाहतुक सोलापूर पासुन→ बार्शी → पुढे येरमाळा या मार्गे पथक्रमण करतील.
11) तुळजापूर ते सोलापूर कडे जाणारी वाहतुक मंगरुळ पाटी पासुन→ इटकळ → बोरामणी →> पुढे सोलापूर या मार्गे पथक्रमण करतील.
12) सोलापूर ते तुळजापूर कडे येणारी वाहतुक सोलापूर पासुन→ बोरामणी → इटकळ→ मंगरुळ पाटी → पुढे तुळजापूर या मार्गे पथक्रमण करतील.
13) तुळजापूर 'ते बार्शी कडे जाणारी वाहतुक तुळजापूर → धाराशिव→ पुढे बार्शी या मार्गे पथक्रमण करतील.
14) बार्शी ते तुळजापूर'कडे येणारी वाहतुक बार्शी →वैराग→ धाराशिव → पुढे तुळजापूर मार्गे पथक्रमण करतील.

वरील बंधने ही पोलीस, रूग्ण सेवा, अग्निशमन दलाची वाहने, अत्यावश्यक सेवेतील वाहने व एस. टी. बसेस या वाहनांना लागू राहणार नाहीत.

जनसंपर्क विभाग धाराशिव पोलीस